**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व)
ता. वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० २५२५१०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaiviracorporation@gmail.com

जा.क्र. : व.वि.श.म./निवडणूक/११०२/१९
दिनांक : १७/०१/२०१९

## जाहीर दरपत्रक सुचना

सर्व संबंधित शहरातील स्टुडियो धारक, कला व सामाजिक संस्था यांना सदर जाहिर पत्रक सुचनेव्दारे सुचित करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका दि.२६ जानेवारी २०१९ ते दि.१० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करावयाचा आहे. सदर कालावधीत लोकशाही निवडणूक व सुशासन "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार !" या थिम व या विषयावर शॉर्ट फिल्म मराठी , हिंदी या भाषेत खालील तक्यात नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून खरेदी करावयाचे आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रती शॉर्ट फिल्म दर | लागू कर | एकूण दर |
|---|---|---|---|---|
| १ | वसई-विरार शहर महानगपालिका क्षेत्रात दि.२६ जानेवारी २०१९ ते दि.१० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करावयाचा आहे या संदर्भात लोकशाही निवडणूक व सुशासन "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार !" या थिम व या विषयावर शॉर्ट फिल्म मराठी, हिंदी या भाषेमध्ये तयार करुन पुरवठा करणे. | | | |

अटी व शर्ती

१) पुरवठादाराने चित्रीकरणाचा अनुभव असल्यास नमुद करावा त्या संबंधीचे दस्तावेज जोडावे.
२) सदर कामासाठी आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही.
३) दर पत्रके मुदतीमध्ये व वेळेमध्ये वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालय आवक जावक विभागात सादर करणे आवश्यक आहे.
४) सदर साहित्यासाठी पुरवठ्याचा दर, आपले लेटर हेड नमुद करून बंद लिफाफयामध्ये दि.२५/०१/२०१९ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत निवडणूक विभागामध्ये सादर करावयाचे आहे.
५) प्राप्त दरपत्रक दि.२५/०१/२०१९ रोजी सायं ४:०० वा.उघडण्यात येतील.
६) मालकाचे /संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.
७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्याचा /नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
८)वरील अटीचे पालन जो पुरवठादार करणार नाही त्याचे दरपत्रक तपासणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.
९) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून रु.१००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा लिहून देण्याचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
१०) फक्त पत्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीच्या दरपत्र विचारात घेण्यात येतील आणि खरेदीचा निर्णय L१ च्या आधारे घेण्यात येतील.
११) शॉर्ट फिल्मची माहिती Script पुरवठा दाराने/ठेकेदाराने संबंधित विभागाकडून मंजूर करून घेणे आवश्यक आहे.
१२) शॉर्ट फिल्मची माहिती अंतीम करण्याआधी संबंधित विभागाकडून त्याचा अभिप्राय घ्यावा त्या अभिप्रायांची माहिती शॉर्ट फिल्म मध्ये अंतर्भाव करण्यात यावा.
१३)शॉर्ट फिल्मची माहिती बनविताना कुठल्याही व्यक्तीचे Copy Right / Trademark इत्यादी उल्लंघन होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठा दारांनी/ठेकेदाराची राहील व तसे झाल्यास ठेकेदार सदरच्या कारवाईस पात्र ठरेल.

सही/-
(डॉ.किशोर गवस)
**उपायुक्त तथा नोडल अधिकारी, निवडणूक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**